जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांचे वेतन सेवार्थ प्रणालीमधून अदा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन आदेश क्रमांकः सकआ २०१४/ प्र.क्र. ३०६/ आस्था २

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, स.सां.कार्य.व क्रि.वि.क्र. सकआ २०००/ प्र.क्र. २७१/ आस्था२, दि. ४.११.२०००

२) शासन निर्णय, ग्रा.वि व पं.रा.विभाग, क्र. सेवार्थ २०१२/ प्रक्र १५६/ आस्था ११, दि. १९.११.२०१२

३) शासन निर्णय, सा.न्या. व वि.स.विभाग, क्र. सकआ २०१३/ प्र.क्र. ३५/ आस्था २, दि. २१.९.२०१३.

<u>प्रस्तावना :</u>

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या ३८ योजना या विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दि.४.११.२००० अन्वये जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. सदर योजनांच्या अंमलबजावणी करीता सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीने प्रतिनियुक्ती भत्ता न देता वर्ग करण्यास मंजूरी देण्यात आली असून या शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते तसेच सेवानिवृत्तीवेतनासह सर्व लाभांकरीता ग्राम विकास विभागाच्या सहमतीने जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

२. या विभागांतर्गतच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते यांची देयके **"सेवार्थ"** वेतन प्रणालीव्दारे अदा करण्यात येतात. त्याचप्रमाणे ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची वेतन व भत्ते यांची देयके **"पंचायत राज सेवार्थ"** प्रणाली व्दारे अदा केली जातात.

३. आतापर्यंत जिल्हा परिषदेमध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत असणाऱ्या सामाजिक न्याय विभागाच्या कर्मचाऱ्यांची वेतन देयके Off-line पध्दतीने जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडून पारित करण्यात येत होती. तथापि आता जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांची वेतन व भत्त्यांची देयके पंचायत राज सेवार्थ या संगणकीकृत प्रणालीव्दारे करण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतलेला असून, केवळ संगणकीय प्रणालीव्दारे कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याच्या वित्त विभागाच्या सूचनांनुसार कोषागार कार्यालयाव्दारे प्रचलित Off-line पध्दतीने देयके स्विकारण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत असणाऱ्या या विभागाच्या कर्मचाऱ्यांची वेतन व भत्ते यांची देयके अदा करण्यामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

४. सद्य:स्थितीत ग्राम विकास विभागाच्या पंचायत राज सेवार्थ प्रणालीमध्ये या विभागाच्या जिल्हा परिषदेमध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भात कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. तसेच सेवार्थ प्रणालीमधून पंचायत राज सेवार्थ प्रणाली मध्ये पद हस्तांतरीत करण्याची कोणतीही तांत्रिक सोय सद्य:स्थितीत उपलब्ध नाही. तसेच सेवार्थ व पंचायत राज सेवार्थ या दोनही प्रणाली पुर्णत: वेगळ्या असल्याने बदलीने / पदोन्नतीने हजर झालेल्या कर्मचाऱ्यांची वेतन व भत्ते याबाबतची देयके अदा करताना तसेच त्यांचे वेतनातून DCPS व इतर संबंधित रकमा कपात करण्यामध्ये अनेक तांत्रीक अडचणी निर्माण होतील. त्यामुळे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या वेतनाबाबत जसे अनुदान उपलब्ध करून सेवार्थ मध्ये देयके तयार करून जिल्हा कोषागाराकडून आहरित करण्याची कार्यवाही केली जाते. त्याप्रमाणेच जिल्हा परिषदेकडे या विभागातील प्रतिनियुक्तीने कार्यरत असणाऱ्या (पदोन्नतीने / बदलीने हजर झालेल्या) कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यांच्या बाबतीत देखील सेवार्थ प्रणालीमधून देयके आहरित करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या वेतनाबाबत जसे अनुदान उपलब्ध करून सेवार्थ मध्ये देयके तयार करून जिल्हा कोषागाराकडून आहरित करण्याची कार्यवाही केली जाते. त्याप्रमाणेच जिल्हा परिषदेकडे या विभागातील प्रतिनियुक्तीने कार्यरत असणाऱ्या (पदोन्नतीने / बदलीने हजर झालेल्या) कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यांच्या बाबतीत देखील सेवार्थ प्रणालीमधून देयके आहरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत शासन आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०३/१६/कोषा ५, दि.२६.८.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०६१५०६३९६८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.02.06 15:10:36 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) आयुक्त, समाज कल्याण पुणे
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे

३) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, पुणे
४) सहसंचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
६) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण (सर्व)
७) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) उपसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) उपसचिव (कोषा प्र ५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई /नागपूर, १/२
११) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१२) निवड नस्ती